# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१

E- 78179

सामान्य प्रशासन विभाग

जाक्र.सआस/कक्ष-१/आस्था-१/२०१ सोलापूर दि. २५/१०/२०२२

## जाहिर प्रसिध्दीकरण

सोलापूर महानगरपालिका मुख्यलेखापरिक्षक कार्यालयाकडील सन -२०१८-१९ ते सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील प्रलंबित लेखापरिक्षण पूर्ण करण्यासाठी ४ सेवानिवृत्त लेखाधिकारी / सहा.लेखाधिकारी यांची शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक. १७ डिसेंबर, २०१६ नुसार विवक्षित कामासाठी मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. याकरिता इच्छुक पात्र उमेदवाराकडून दिनांक २८/१०/२०२२ ते दिनांक.02/11/२०२२ अखेर पर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून) अर्ज मागविणेत येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी आस्थापना-४, सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर येथे नमूद कालावधीमध्ये अर्ज सादर करावे.

| अ.क्र. | तपशिल | पद संख्या | मानधन |
|---|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त लेखाधिकारी | ०१ | दिनांक १७ डिसेंबर, २०१६, रोजीच्या शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानुसार |
| २ | सेवानिवृत्त सहाय्यक लेखाधिकारी / वरिष्ठ लेखा लिपीक | ०३ | |

विवक्षित स्वरुपाचे कामासाठी खालील नमूद शर्ती व अटीस अधिन राहून अर्ज मागविणेत येत आहेत.

**अटी व शर्ती :-**

१. सोबतच्या नमून्यातील परिपुर्ण भरलेला अर्ज उमेदवाराने सदर कालावधीमध्ये अर्ज सादर करावा.
२. शासकीय सेकवेतील सेवानिवृत्तीबाबतचे ओळखपत्र व अंतिम वेतनदाखला (सेवानिवृत्तीपूर्वीचे वेतन दाखला), जन्म तारखेचा दाखला, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र इत्यादी अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.
३. नियुक्तीच्या कालावधीमध्ये उमेदवाराचे काम असमाधानकारक आढळून आल्यास तसेच गैरवर्तणूक केल्यास कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.
४. सदरहु काम सन २०१८-१९, २०१९-२०२०, २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील प्रलंबित लेखापरिक्षण पुर्ण करण्यासठी असेल.
५. शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रातील सेवानिवृत्त अधिकारी यांची लेखाधिकारी/सहा.लेखाधिकरी यापदावरील सेवा नियुक्तीसाठी ग्राह्य धरली जाईल.
६. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
७. नियुक्ती संदर्भात अंतिम अधिकार अध्यक्ष तथा आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांना

राहतील आणि निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार त्यांनी राखून ठेवले आहे.

८. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक - संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील. तसेच नेमण्यात योणाऱ्या अधिकाऱ्यांचे मासिक परिश्रमिक / मानधन उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येईल.

९. सेवानिवृत्त अधिकारी यांचे वय ६५ वर्षे पेक्षा कमी असावे किंवा त्यापेक्षा कमी असणाऱ्यांना प्राधान्य राहील.

१०. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने काम करण्यास सक्षम असावा. तसेच त्यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसावी.

११. करार पध्दतीने नियुक्ती करणेत आलेली व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेला नसावा.

१२. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१३. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांच्यावर नियुक्ती कालावधीमध्ये सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

१४. सदरची सेवा ही फक्त ३ वर्षाच्या मर्यादेकरिताच राहणार आहे. तथापि, नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीमधील कामकाजाचे मूल्यमापन करुन कामकाज उत्कृष्ठ असल्यावरच त्यांना पुढे मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

१५. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१६. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस सोलापूर महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे अथवा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

१७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. त्यासाठी बंधपत्र / हमीपत्र नेमणूकीअंती सादर करणे आवश्यक राहील.

१८. करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा व नेमणूकीअंती नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही याबाबतचे बंधपत्र / करारपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१९. अर्जदार यांचे अर्जाचे अनुषंगाने मुलाखतीची तारीख व वेळ स्वतंत्ररीत्या संबंधितास मोबाईल नंबर, ई-मेल आय-डी व सोलापूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
**आयुक्त,**
सोलापूर महानगरपालिका

Signed by P.sivasankar
Date: 21-10-2022 19:46:39
Reason: Approved

१) संगणक विभाग -
२) डॉ.उ.मं.सं.अ. कार्यालय

# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१

## सामान्य प्रशासन विभाग

---

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक :-

प्रति,
मा.आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका,
सोलापूर.

अलीकडील रंगीत छायाचित्र लावावे

पदाचे नाव :- ________ पद क्र. -------- या पदाकरीता अर्ज.

१. उमेदवारांचे संपूर्ण नाव :- ________
२. उमेदवारांचे बदल असलेले नाव :- ________
३. उमेदवारांचे वडील / पती यांचे संपूर्ण नाव :- ________
४. उमेदवारांची जन्म तारीख :- दिवस --------- महिना ---------- वर्ष---------

अक्षरी जन्म तारीख :- ________

वय :- -------- वर्ष पुर्ण,----------- महिने पुर्ण,----------दिवस.

५. उमेदवाराचा पत्ता :- ________

मोबाईल क्रमांक :- ________
(नमुद करणे अनिवार्य)

६. अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र :- आहे / नाही (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)
७. अर्जदारकडे जातीचे प्रमाणपत्र :- आहे / नाही (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)
जातीचा प्रवर्ग :- ________ जातीचे नाव :- ________
अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :- ________
(नमुद करणे अनिवार्य)

८. अर्जदाराची वैवाहिक परिस्थिती :- विवाहीत / अविवाहीत (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)

अर्जदाराकरीता टिप :- अर्ज कार्यालयास जमा केल्याची पोहोच पहिजे असल्यास, सदरील पानावरील संपूर्ण माहिती भरुन झेरॉक्स काढून घेऊन येणे.

९. इतर शैक्षणिक अर्हता :-

| अभ्यासक्रम / कोर्स | विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०. सेवानिवृत्ती पूर्वी कार्यारत कार्यालय

| अ.क्र. | कार्यालयांचे नाव | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| १ | | | | | |
| | | | | | |

११. अर्जसोबत खालील प्रती सांक्षाकित करुन जोडलेल्या आहेत.

१. पेन्शन पेमेंट ऑर्डर छायांकित प्रत. ६. ------------------------------------------

२. ------------------------------------------ ७.------------------------------------------

३. ------------------------------------------ ८.------------------------------------------

४. ------------------------------------------ ९.------------------------------------------

५. ------------------------------------------ १०.------------------------------------------

१२. वरील नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदाकीरता विहीत केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की वर दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहिल व त्याबाबतची माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीतील नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- सोलापूर अर्जदार स्वाक्षरी :- ----------------------------

दिनांक :- / /२०२२. अर्जदाराचे नाव :- ----------------------------

===================================================